शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

12 APR 2025

तरुण भारत

# महात्मा फुले यांचे शिक्षण आत्मसन्मान देणारे




**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के आणि प्र–कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते महात्मा फुले यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. यावेळी मान्यवर उपस्थित होते.**

■ **डॉ. श्यामसुंदर मिरजकर यांचे प्रतिपादन**

प्रतिनिधी

कोल्हापूर

महात्मा फुलेंचे शैक्षणिक कार्य व विचार केवळ अक्षर ओळख व अंकगणित इतक्या पुरते मर्यादित नव्हते, त्यांचे शिक्षण हे बहुजन समाजातील विद्यार्थ्यांना बौद्धिक, सामाजिक, नैतिक विकास आणि आत्मसन्मान देणारे होते, असे प्रतिपादन डॉ. श्यामसुंदर मिरजकर यांनी आज केले.

शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राच्यावतीने सुरु असलेल्या फुले–शाहू–आंबेडकर सप्ताहाच्या तिसऱ्या दिवशी महात्मा फुले यांच्या जयंतीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या ऑनलाईन व्याख्यानात ते बोलत होते. प्रास्ताविक डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी केले. यावेळी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के व प्र–कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील उपस्थित होते.

डॉ. मिरजकर म्हणाले, बौद्धिक स्तरावर कोणीही श्रेष्ठ अथवा कनिष्ठ नाही. त्यामुळे सर्वांना शिक्षण घेण्याचा अधिकार मिळाला पाहिजे. त्यासाठी हंटर कमिशन पुढे साक्ष देताना ब्रिटीश सरकारने प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत केले पाहिजे, बहुजन समाजातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळाली पाहिजे, अशी मागणी निवेदनाद्वारे महात्मा फुले यांनी केली. बहुजन समाजातील विद्यार्थांना शिकविण्यासाठी त्याच समाजातील शिक्षकांची नेमणूक केली जावी. सरकार बहुजन समाजातील शेतकऱ्यांकडून शेतसारा घेते परंतु त्यांच्या, मुलांना शिक्षण देत नाही हे चुकीचे आहे तर त्यांनासुद्धा शिक्षण मिळाले पाहिजे. महात्मा फुले यांनी सर्व वर्गातील स्त्रिया, शूद्र व अतिशूद्र समाजातील विद्यार्थांना शिक्षण देण्यासाठी शाळा सुरु केल्या. महात्मा फुले कृतीशील व वैचारिक समाजसुधारक होते. शिवाजी विद्यापीठाच्या शिववार्ता या युट्युब वाहिनीवरून प्रसारण करण्यात आले. विद्यापीठाच्या जनसंपर्क कक्षाद्वारे याचे संयोजन करण्यात आले.

महात्मा फुले यांना अभिवादन

शिवाजी विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के आणि प्र–कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते महात्मा फुले यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, क्रीडा विभागाचे संचालक डॉ. शरद बनसोडे, आजीवन अध्ययन केंद्राचे संचालक डॉ. रामचंद्र पवार, डॉ. तृप्ती करेकट्टी, डॉ. कैलास सोनवणे, डॉ. प्रभंजन माने, डॉ. मच्छिंद्र गोफणे, डॉ. ए. बी. कोळेकर आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 APR 2025
पुण्यनगरी

# विद्यापीठात महात्मा फुलेंना अभिवादन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीत जयंती निमित्ताने महात्मा फुलेंना अभिवादन करण्यात आले. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते महात्मा फुले यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले.

यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, क्रीडा विभागाचे संचालक डॉ. शरद बनसोडे, आजीवन अध्ययन केंद्राचे संचालक डॉ. रामचंद्र पवार, डॉ. तृप्ती करेकट्टी, डॉ. कैलास सोनवणे, डॉ. प्रभंजन माने, डॉ. मच्छिंद्र गोफणे, डॉ. ए. बी. कोळेकर आदी उपस्थित होते.

12 APR 2025
लोकसत्ता
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# जाधव गुरूजींच्या निरूपणातून तुकाराम गाथा अभ्यासाची परंपरा समृद्ध

## डॉ. सदानंद मोरे यांच्याकडून गौरव



डॉ.सदानंद मोरे, डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते डॉ. डी. वाय. पाटील पुरस्कार आनंदी जाधव यांना प्रदान करण्यात आला.

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**कोल्हापूर :** मारूतीराव जाधव (तळाशीकर) गुरूजींच्या गाथेचे प्रकाशन होणे ही फार महत्त्वाची गोष्ट आहे. या गाथेचे प्रचार आणि प्रसार हळूहळू संपूर्ण राज्यभर होणे ही सुखावणारी गोष्ट आहे. त्यांच्या निरूपणाने तुकाराम गाथेच्या अभ्यासाची परंपरा समृद्ध केली, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत डॉ. सदानंद मोरे यांनी येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या संत तुकाराम अध्यासनाच्यावतीने आयोजित पुरस्कार वितरण समारंभात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के उपस्थित होते. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील उपस्थित होते.

पहिला पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील पुरस्कार स्व. तळाशीकर गुरूजी यांच्यावतीने आनंदी मारूतीराव जाधव यांनी तर, सद्गुरू डॉ. गुरूनाथ मुंगळे आध्यात्मिक तत्वज्ञान साहित्य पुरस्कार आयआयटी कानपूर येथील प्रा. समीर चव्हाण यांना मोरे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.

गौरी कहाते, अरूण जाधव, डॉ. समीर चव्हाण यांनी मनोगत व्यक्त केले. माजी खासदार प्रा. संजय मंडलीक, डॉ. प्रतापराव माने, गोकुळचे अध्यक्ष अरूण डोंगळे उपस्थित होते. डॉ. नंदकुमार मोरे यांनी प्रास्ताविक, डॉ. रणधीर शिंदे यांनी पाहुण्यांचा परिचय, प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन, कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी आभार मानले.

12 APR 2025

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठ प्रश्नपत्रिका देणार, कॉलेज मूल्यमापन करणार


## प्रथम वर्षाच्या परीक्षांबाबत विद्या परिषदेचा निर्णयः सुविधा नसल्याने नऊ महाविद्यालयांतील परीक्षा केंद्र रद्द

■ सकाळ वृत्तसेवा

**कोल्हापूर, ता. ११ : पदवी प्रथम वर्षाच्या परीक्षांचे वेळापत्रक, प्रश्नपत्रिका शिवाजी विद्यापीठाचे परीक्षा व मूल्यमापन मंडळ देणार असून उत्तरपत्रिकांच्या मूल्यमापनाचे काम महाविद्यालय (कॉलेज) करणार आहेत. त्याबाबतचा निर्णय आज विद्यापीठ विद्या परिषदेच्या बैठकीत घेण्यात आला. कोल्हापूर, सांगली जिल्ह्यातील नऊ महाविद्यालयांमधील परीक्षा केंद्र रद्द करण्याचा निर्णय यावेळी झाला.**

### व्यवस्थापन परिषदेच्या एका जागेचा निकाल सीलबंद

■ व्यवस्थापन परिषदेच्या पुरुष गटासाठी एका जागेसाठी रसायनशास्त्र विभागातील प्रा. डॉ. एस. पी. हंगिरगेकर आणि सुटाचे विद्या परिषद सदस्य प्रा. आर. के. चिमट यांच्या उमेदवारीसाठी मतदान झाले. मात्र, डॉ. चिमट यांनी डॉ. हंगिरगेकर यांच्या सदस्यपदासंदर्भात हरकत घेतल्याने मतदान होऊन निकाल सीलबंद करण्यात आला. त्यात ३५ जणांनी मतदान केले. कुलपती कार्यालयाकडून मार्गदर्शक सूचना प्राप्त झाल्यानंतर संबंधित निकाल जाहीर केला जाणार आहे.



गेल्या सत्रापासून पदवींच्या प्रथम, द्वितीय वर्षाच्या परीक्षा विद्यापीठातर्फे घेतल्या जात आहेत. मात्र, काही महाविद्यालयांनी त्यावर विरोध करत यातील प्रथम वर्षाच्या परीक्षा स्वतः घेण्याची तयारी दर्शविली.

या परीक्षांच्या प्रश्नपत्रिका काढल्या असून या परीक्षा विद्यापीठाचे परीक्षा मंडळ घेण्यावर ठाम राहिले. त्याबाबत आजच्या विद्या परिषदेच्या बैठकीत चर्चा झाली. त्यात या परीक्षांचे वेळापत्रक, प्रश्नपत्रिका तयार करणे, एसआरपीडीद्वारे प्रश्नपत्रिका पाठविण्याची कार्यवाही परीक्षा मंडळाने करावी, तर उत्तरपत्रिकांचे मूल्यमापन महाविद्यालयांनी करावे, असा निर्णय घेण्यात आला.

परीक्षा घेण्याबाबतच्या आवश्यक त्या पायाभूत सुविधा आणि पुरेसे शिक्षक नसल्याने आणि त्यांना परीक्षा कामकाजाचा अनुभव नसल्याने विद्यापीठ कार्यक्षेत्रातील नऊ महाविद्यालयांतील परीक्षा केंद्र रद्द करण्याचा निर्णय यावेळी घेण्यात आला.

त्यात कोल्हापूर जिल्ह्यातील राधानगरी, शाहूवाडी तालुक्यातील प्रत्येकी दोन, तर कागल, पन्हाळा, करवीर तालुक्यातील प्रत्येकी एक आणि सांगली जिल्ह्यातील वाळवा, जतमधील प्रत्येकी एका महाविद्यालयातील केंद्रांचा समावेश आहे. या महाविद्यालयांपासून जवळ असलेल्या दुसऱ्या अनुदानित महाविद्यालयांना परीक्षा केंद्र देण्यात आले आहे.

विधी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी कॅरिऑन आणि पूरग्रस्त गावातील विद्यार्थ्यांना फी माफीबाबत निर्णय घेण्यासाठी समिती स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली. काही महाविद्यालयांनी एम. एस्सी. अभ्यासक्रम सुरू केले.

मात्र, अपुरे मनुष्यबळ असल्याने हे अभ्यासक्रम सुरू ठेवायचे की नाही, असा प्रश्न विद्या परिषदेसमोर आला. त्यावर यावर्षी संबंधित अभ्यासक्रम चालू ठेवण्याचा, मान्यता देण्याचा निर्णय घेण्यात आला. कळे येथील एका महाविद्यालयाला १२० ची नोटीस देऊन तेथील प्रवेश गोठविण्यासह काही तुकड्या रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला.